Seat No.
बैठक क्र.

| 2024 | III | 26 | 1100 |
|---|---|---|---|
| २०२४ | ०३ | २६ | ११०० |

# N 670

(M) (म)

## SOCIAL SCIENCES (73) GEOGRAPHY PAPER-II
## सामाजिक शास्त्रे ( ७३ ) भूगोल पेपर - २
### (REVISED COURSE)

Time : 2 Hours (Pages – 8) Max. Marks : 40
वेळ - २ तास ( पृष्ठे - ८ ) एकूण गुण - ४०

**सूचना :**

(1) सर्व प्रश्न/कृती सोडविणे आवश्यक आहे.

(2) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

(3) प्रश्न क्रमांक 4(अ) साठी पुरविण्यात आलेल्या ब्राझीलच्या नकाशा आराखड्याचा वापर करून तो मुख्य उत्तरपत्रिकेस जोडावा.

(4) प्रश्न क्रमांक 6(अ) साठी पुरविण्यात आलेल्या आलेख कागदाचा वापर करून ती पुरवणी मुख्य उत्तरपत्रिकेस जोडावी.

(5) प्रश्नांची उत्तरे लिहितांना नकाशा काढण्यासाठी स्टेन्सिलचा आवश्यक तेथे वापर करण्यास परवानगी आहे.

(6) प्रश्नांची उत्तरे लिहितांना आवश्यक तेथे आकृत्या/आलेख काढावेत.

(7) प्रश्नांची उत्तरे निळ्या किंवा काळ्या शाईच्या पेनने लिहावीत. पेन्सिलने लिहिलेले उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

(8) आकृत्या, आलेख व नकाशा इत्यादी कार्य करण्यासाठी शिस पेन्सिल किंवा रंगीत पेन्सिल वापरण्यास हरकत नाही.

1. अचूक पर्याय निवडून विधाने पूर्ण लिहा : 4

(1) पँटानल या दलदलीच्या प्रदेशात .................... आढळतात.

(i) कोंडोर

(ii) गुलाबी डॉल्फिन

(iii) महाकाय ॲनाकोंडा

(iv) मकाव

(2) लोकसंख्येच्या वितरणावर .................... हा घटक परिणाम करतो.

(i) प्राकृतिक रचना

(ii) लिंग गुणोत्तर

(iii) साक्षरता

(iv) आयुर्मान

(3) ब्राझीलमध्ये सर्वत्र सामान्यपणे .................... वाहतूक आढळते.

(i) हवाई

(ii) जल

(iii) रस्ते

(iv) लोह

(4) क्षेत्रभेटी दरम्यान माहितीच्या संकलनासाठी .................... या साहित्याची आवश्यकता असते.

(i) खुर्ची

(ii) फळा

(iii) पाण्याची बाटली

(iv) प्रश्नावली

**2.** **वेगळा घटक ओळखा :** 4

(1) ब्राझीलच्या किनारपट्टीवरील राज्ये –

*(i)* रिओ दी जनेरीओ

*(ii)* पराईबा

*(iii)* आमापा

*(iv)* आक्रे

(2) भारतातील अतिजास्त पर्जन्याचा प्रदेश –

*(i)* पश्चिम राजस्थान

*(ii)* पश्चिम घाट

*(iii)* मेघालय

*(iv)* अरुणाचल प्रदेश

(3) ॲमेझॉन नदीच्या उपनद्या –

*(i)* पारू नदी

*(ii)* पुरुस नदी

*(iii)* पॅराना नदी

*(iv)* जुरूका नदी

(4) भारताच्या द्वीपकल्पीय प्रदेशात आढळणारे प्राणी –

*(i)* गवा

*(ii)* हरिण

*(iii)* काळवीट

*(iv)* याक

3. **थोडक्यात टिपा लिहा (कोणतेही दोन) :** 4

(1) परतीचा मानसून

(2) भारतातील पानझडी वने

(3) ब्राझीलची ऐतिहासिक पार्श्वभूमी

4. **(अ) ब्राझीलच्या नकाशा आराखड्यात माहिती भरा व सूची तयार करा (कोणतेही चार) :** 4

(1) ब्राझीलमधील सर्वोच्च शिखर

(2) साओ फ्रन्सिस्को नदी

(3) माराजॉ बेट

(4) पंपास

(5) विषुववृत्त

(6) ब्राझीलची राजधानी

**(आ) खालील भारताच्या नकाशाचे वाचन करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही चार) :** 4




**प्रश्न :**

(1) वरील नकाशाचे शीर्षक व उपशीर्षक काय आहे?

(2) कोणत्या भागात रस्ते मार्गाची घनता जास्त आहे?

(3) पश्चिम किनाऱ्यावरील दोन बंदरांची नावे लिहा.

(4) पोरबंदर ते सिल्चर महामार्गाचे नाव लिहा.

(5) कोलकाता जवळील बेटाचे नाव लिहा.

**5. भौगोलिक कारणे लिहा ( कोणतेही दोन ) :** **6**

(1) हिमालयाच्या उंच भागात वनस्पतींची संख्या विरळ आढळते.

(2) ब्राझीलमध्ये उष्णकटिबंधीय वादळे कमी प्रमाणात होतात.

(3) किनाऱ्याकडून ब्राझीलच्या अंतर्गत प्रदेशात ॲमेझॉन नदीच्या खोऱ्यात जाताना मानवी वस्त्या अधिक विरळ होत जातात.

(4) भारताच्या अर्थव्यवस्थेत मत्स्य व्यवसायाची भूमिका महत्त्वाची आहे.

https://www.maharashtrastudy.com

**6. ( अ ) खालील दिलेल्या सांख्यिकीय माहितीच्या आधारे साधा स्तंभालेख काढा व खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :** **6**

**भारत – नागरीकरणाचा कल**

**(1961 - 2011)**

| वर्ष | नागरीकरण % ( टक्के ) |
|---|---|
| 1961 | 18·0 |
| 1971 | 18·2 |
| 1981 | 23·3 |
| 1991 | 25·7 |
| 2001 | 27·8 |
| 2011 | 31·2 |

**प्रश्न :**

(1) 1961 साली नागरीकरण किती टक्के झाले होते?

(2) कोणत्या दशकात नागरीकरण सगळ्यात कमी होते?

(3) 1991 साली नागरीकरण किती टक्के झाले होते?

**किंवा**

**( आ ) खालील आलेखाचे वाचन करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :** **6**

**भारत आणि ब्राझील**

**राष्ट्रीय उत्पादनातील योगदान व गुंतलेली लोकसंख्या**




**प्रश्न :**

(1) आलेखात कोणती क्षेत्रे दर्शविलेली आहेत?

(2) भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात कोणत्या क्षेत्राचा वाटा सर्वाधिक आहे?

(3) ब्राझीलच्या प्राथमिक क्षेत्रात गुंतलेल्या लोकसंख्येची टक्केवारी किती आहे?

(4) दोन्ही पैकी कोणत्या देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात प्राथमिक क्षेत्रातील योगदान कमी आहे?

(5) राष्ट्रीय उत्पादनात तृतीयक क्षेत्रातील योगदान कोणत्या देशाचे कमी आहे?

(6) ब्राझीलची 19% लोकसंख्या कोणत्या क्षेत्रात गुंतलेली आहे?

**7. खालील प्रश्नांची उत्तरे सविस्तर लिहा ( कोणतेही दोन ):** **8**

(1) कारखान्यास भेट देण्यासाठी प्रश्नावली तयार करा.

(2) ब्राझीलच्या किनारी प्रदेशाची माहिती लिहा.

(3) भारतातील लोकसंख्या वितरणावर परिणाम करणारे घटक स्पष्ट करा.

◆◆◆